# गा तू गाणी

निळ्या नभातील, एक चांदणी
मला म्हणाली, गा तू गाणी... गा तू गाणी ॥धृ॥

जुन्या आठवणी मनात सजती
पुन्हा पुन्हा त्या मला सांगती
येतो आम्ही तुझ्या संगती
लिही अमुच्यावर तू सुंदर गाणी... सुंदर गाणी
निळ्या नभातील, एक चांदणी... ॥ १ ॥

झुळझुळणाऱ्या नदीकिनारी
हिरव्या, पिवळ्या वेलीवरती
दूरदूरचे पक्षी जमती
हर्षभराने गाती गाणी... गाती गाणी
निळ्या नभातील एक चांदणी ॥ २ ॥

नयनरम्य एकांतस्थळी
युगुलांची ती सुंदर जोडी
नित्य येतसे सांजवेळी
मिळून गाती ते मंजुळ गाणी... मंजुळ गाणी
निळ्या नभातील एक चांदणी ॥ ३ ॥

अंधुक झाली सरती किरणे
दूर किनारी दीप उजळले
शीतल वारे मला म्हणाले
सांग तुझी ती नवीन गाणी... नवीन गाणी
निळ्या नभातील एक चांदणी ॥ ४ ॥

गंध फुलाचे मना भावले
रातराणीने पंख पसरले
झुळझुळणारी सरीता बोले
माझ्या संगे, गा तू गाणी... गा तू गाणी
निळ्या नभातील एक चांदणी ॥ ५॥

– पद्माकर चित्रे
('बोल अंतरीचे' या कवितासंग्रहातून)